The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्य आणिप्रबोधन

संशोधक विद्यार्थिनी : संगीता भास्कर मकासरे
प्रा. डॉ. दिलीप बिरुटे
मराठी विभाग प्रमुख संत ज्ञानेश्वर, महाविद्यालय सोयगाव

**प्रास्ताविक :-** भारतामध्ये व महाराष्ट्र राज्यात विविध संप्रदायांमधील संत मंडळींनी आपल्या साहित्यातून समाज प्रेरित करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत महात्मा बसवेश्वर, संत जनाबाई, संत बहिणाबाई, संत सोयराबाई, संत रविदास, संत कान्होपात्रा, संत चोखामेळा, संत कबीर, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशा या महान संतांनी आपल्या अभंग रचनेतून आणि कर्तुत्व पर आचरणातून अंधश्रद्धानिर्मूलनाचे कार्य केले तर नास्तिक शिरोमणी चार्वाक, भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले,सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, स्वामी विवेकानंद या विचारवंतांनी संतांच्या विचाराने प्रेरित होऊन सामाजिक उद्धार व प्रबोधन घडवून आणले, याचमुळे खऱ्या अर्थाने अंधश्रद्धा निर्मूलनाचे मूळ स्त्रोत संत साहित्यातून दिसून येते.

महाराष्ट्रातील संत साहित्य आणि संतांच्या कार्याचा परामर्श अनेक अभ्यासक आपापल्या परीने घेत आहे. संत साहित्याकडे सामाजिक भूमिकेतून पाहण्याचे काम न्यायमूर्ती रानडे यांनी केले.पाश्चिमात्य विचारसरणीचा प्रभाव असूनही त्यांनी संत चळवळीकडे समन्वयवादी विधायक भूमिकेतून पाहिले. धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टिकोन इत्यादी भूमिकेचा अवलंब करून समाजचिंतकांनी काळाचे भान समोर ठेवून समाजवाद व धर्मनिरपेक्षता ही तत्वे प्रामाणिकपणे स्वीकारली पाहिजे अशी विचारसरणी रानडेंनी मांडली.

समाजाच्या मनावर देव धर्माचा आणि अंधश्रद्धेचाफार मोठा पगडा पिढ्यानपिढ्या दिसतो. हिंदू समाज गेली अनेक वर्ष अनिष्ट रूढी, प्रथा परंपरा, रीतीरिवाज, जात– धर्म, अज्ञान, कर्मकांड, दैववाद, पाप –पुण्य, जन्म - मृत्यू यासारख्या अनिष्ट समाज विघटन करणाऱ्या बाबींमध्ये अडकून पडला आहे. तो मुक्त करण्यासाठी संतांनी आपल्या अभंग रचनेतून प्रबोधन केले आहे. याचबरोबर संत कालीन महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय बाबीचे विवेचन करताना गं. भा. सरदार लिहितात, " भौतिक दुरवस्था व मानसिक गुलामगिरी यामुळे सामान्य जनता जडमूढ व अगतिक बनलेली होती. या केविलवाण्या स्थितीतून तिला मुक्त करण्यासाठी संत चळवळ जन्मास आली. या चळवळीचे कार्यक्षेत्र बऱ्याच अंशी धार्मिक व सांस्कृतिक होते. सामाजिक जीवनातील मूलभूत प्रश्नांना तिने हात घातला नाही. युरोप प्रमाणे आर्थिक झगडयाची तिला साथही मिळाली नाही. शास्त्र प्रमान्यालाव जाती व्यवस्थेला धक्का न लावता वारकरी पंथाने स्त्रीशुद्रादिकांना आत्मविकासाचा मार्ग खुला करून दिला. पूर्वकर्मानुसार प्राप्त झालेल्या बाह्य परिस्थितीत आपणास यत्किंचीतही बदल करता आला नाही. तरी हाताश होण्याचे कारण नाही. कोणत्याही जातीच्या मनुष्याला भक्तिपंथाच्याद्वारा आध्यात्मिक उन्नती साधता येईल, नैतिक सामर्थ्य वाढविता येईल, प्रापंचिक दुःखावर मात करता येईल असा अगदी खालच्या थरातील लोकातही या चळवळीने विश्वास निर्माण केला. संत चळवळीने सर्वसामान्यांना असा विश्वास निर्माण केल्यामुळे समाजाच्या कुणबी, माळी, तेली,सुतार, कुंभार, महार या सर्व जाती धर्मातून संत उदयाला आले. या संतांनी आपल्या प्रवचनातून अभंगाद्वारे समाजात समता, बंधुता, प्रस्थापित व्हावी व समाज उद्धारासाठी अभंगातून मौलिक विचारधन दिले आहे.

बाराव्या शतकात संत महात्मा बसवेश्वरांनी आणि तेराव्या शतकात संत नामदेवांनी बहुजन समाजाला ब्राह्मणी व्यवस्थेच्या समाज विघटन करणाऱ्या मगरमिठीतून सोडविण्याचा प्रयत्न केला. महात्मा बसवेश्वरांनी वर्ण, जात, कुळ, गोत्र, निरर्थक ठरविले आणि आचरणाला महत्त्व दिले. महात्मा बसवेश्वर आपल्या वचनात म्हणतात

" जातीचे श्रेष्ठत्व हाचीवेडाचार
शतकोटी विप्र काय कीजे !!
कोणत्या कुळात जन्मले शरण
व्यर्थची जाण शोधणे ते !!
जाती संकरणे लिंगधारी कुळीन

उच्चतेची जान देती ग्वाही !! ``

तसेच संत चोखामेळा यांनी आपल्या अभंगातून सामाजिक विषमतेची मांडणी करून आपल्या मनातील जातीभावनेचा, जाती अपमानाचा स्पष्ट उल्लेख करून समाजात समता प्रस्थापित व्हावी यासाठी आपल्या साहित्यातून प्रबोधनाची भूमिका घेतली. शिवाय त्यांनी आत्मप्रकटीकरणाबरोबर सामाजिक जीवनातील शल्ये अभंगातून चित्रित केली आहेत. सामाजिक विषमतेचा निषेधही करतात. संत चोखामेळा आपल्या अभंगात म्हणतात

" हीनयाती माझी देवा,कैशी घडावी तुझी सेवा
जोहार मायबाप जोहार, मी संता घरचा महार !! ``

" ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा
काय भुललासी वरलीया रंगा !! ``

संत कर्ममेळा यांनी देखील संत चोखामेळासारखी आपली भावना अभंगातून व्यक्त केली आहे.

" आमुची केली हीनयाती !
तूज का नकळे श्रीपती !
जन्म गेला उष्टे खाता !
लाज नये तुमच्या चित्ता !!``

संत चोखामेळाचा मुलगा कर्ममेळा व पत्नी सोयराबाई यांनीही आपल्या अभंगातून विचार मांडलेले आहे

" देहिचा विटाळ देहीच जन्माला ! सोवळा तो झाला कवणाधर्म ? !! विटाळा वाचोनी उत्पत्तीचे स्थान ! कोण देह निर्मळ नाही झाला !! ``

मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात अनेक संतांनी अस्पृश्यता, माणसातील भेदभाव, उच्चनीचता यावर आपल्या कीर्तन व अभंगातून आवाज उठविला आहे. त्यांनी देव, धर्म, वर्ण, कर्मकांड, अंधश्रद्धा, विषमता, जातीयता याबद्दल विद्रोह व नापसंती व्यक्त केली आहे. जाती व्यवस्था हे वर्ण व्यवस्थेचे अपत्य आहे. देव आणि धर्म ही भीती आहे. या भीतीमुळेच समाज आपल्या खऱ्या स्वातंत्र्याला मुकला आहे. संत नामदेवांनी आपल्या अभंगातून समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला आहे. संत नामदेव म्हणतात

" दगडाचा देव मानीला ईश्वर !
परी तो साचार देवभिन्न !!
दगडाचा देव इच्छापूरवीत !
तरीका भंगत आघाताने !! ``

" पाषाण देवाची करती जे भक्ती
सर्वस्वी मुक्ती मूढपणे !! ``

जीवननिष्ठा - स्वाभिमान हरवून बसलेल्या व परावलंबी होऊन ब्राह्मणी व्यवस्थेचे गुलाम बनलेल्या लोकांचा त्यांच्या अंतर्मनाचा आवाज संत नामदेवांना सहन होत नव्हता. संत नामदेवाच्या काळात धर्मसत्ता ब्राह्मणाच्या ताब्यात होती. मनुस्मृती ही ब्राह्मणी धर्माची राज्यघटना होती. संत नामदेवांनी उत्तर भारतात जाऊन तेथील लोकांमध्ये विवेक जागृती अभियान आपल्या अभंगवाणीतून चालविले. उत्तर भारतात जी वैदिक ब्राह्मणी व्यवस्था होती त्या व्यवस्थेविरुद्ध संतांनी विशेषता रविदास - कबीरांनी चालविलेली चळवळ होती व त्या चळवळीतील साहित्य याचे प्रेरणास्थान नामदेव होते. ज्या संत नामदेवांना संत कबीर गुरु मानतात त्या कबीराला डॉ. बाबासाहेब आंबेडकर गुरु मानतात ही विचारधारा वश्रृंखला आम्ही समजून घेतली पाहिजे. भारतीय राज्य घटना आणि मानवी हक्काची सनद जन्माला येण्यापूर्वीची संत नामदेव आपल्या कीर्तनातून सर्वाभूती समदृष्टी हीच भक्ती गोमटी ! असे समतेचे तत्व निर्भीडपणे समाजाला सांगितले. संत नामदेव तुकारामाच्या विचाराचा वारसा संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी चालविला आहे.

संत नामदेवांनी मनुष्याच्या उन्नतीचे साधन ज्ञान आहे हे ओळखले होते. म्हणूनच तेराव्या शतकात नामदेवांच्या कीर्तनात अभंगातून दिसून येते. " नाचू कीर्तनाच्या रंगी !
ज्ञानदीप लावू जगी !!

तर संत जनाबाईंनी संत नामदेवाविषयी व्यक्त केलेल्या कवणातून ही स्पष्ट होते." बाई मी लिहून शिकले ! सद्‌गुरुराया पासी!! ``

संत जनाबाई, सद्‌गुरु राया, नामदेवास म्हणते संत नामदेवाची स्त्री - पुरुष समानतेची भावना व्यक्त होते. स्त्री - पुरुष समानता हा त्यांच्या संकल्पनेचा गाभा होता.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात संतांचे कार्य अनन्यसाधारण आहे. सतराव्या शतकामध्ये सामाजिक प्रबोधनाचे मुहूर्तमेढ रोवणारे सुधारक संत म्हणून तुकाराम महाराजांचा उल्लेख केला जातो. तसेच ब्राह्मणी विचारांच्या विषाणूमुळे वर्णव्यवस्थेची जातिभेदाची कीड समाजात दिवसेंदिवस वाढतच होती. म्हणून तुकारामांनी ब्राह्मणी व्यवस्थेच्या विरोधात कीर्तनाद्वारे, अभंगाद्वारे विद्रोह करीत होते. संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतात -

" १) देव आहे अंतर्यामी
कारे फिरता तीर्थग्रामी !! ``

२) पाहूनिजनाचा ऐसा हा आकांत !
परपीडे चित्त दुखी होय !!

३) " बुडत हे जन न देखवे डोळा !
म्हणोनि कळवळा येतसे !! ``

संत तुकारामांनी आपल्या अभंग कीर्तनाद्वारे समाजाला विचार करण्यास भाग पाडले होते. देवबाहेर न शोधता आपल्या अंतरंगात शोधला पाहिजे. तसेच वर्ण जाती व्यवस्थेमुळे समाजात पूर्वग्रह दूषित विचार जोपासले जातात, या व्यवस्थेमुळे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, अन्याय - अत्याचार होतात. जाती धर्मामुळे समाजाचा एकोपा बुडत असल्याची खंत व्यक्त होते. याबाबत आर. जे. पंडित लिहितात " जो धर्म मानवी हितातून मानवी संस्कारातून व मानवी कल्याणातून समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायाचा स्वीकार करतो तो उच्चतम धर्म ठरतो.`` म्हणूनच स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्याय हिगण व्यवस्थेची चतु :सूत्री आहे याची जाणीव व आत्मभान संतांनी समाजाला करून दिले.

संतांनी आपल्या कीर्तन व अभंग वाणीतून समाज जागृती बरोबरच ज्ञानाचे महत्त्व विशद केले आहे. ज्ञानाच्या जोडीला विज्ञान असेल तर माणूस चौकस होतो. ज्ञानाच्या बळावर तर्कनिष्ठ, विवेकवादी दृष्टिकोनाने वागत असतो. कोणतीही गोष्ट अंधपणाने स्वीकारत नाही हे संतांनी स्वपरिक्षणातून जाणले होते. तुकाराम महाराज आपल्या अभंगात म्हणतात- " विज्ञा – ज्ञान गुणे अधिकार पावले
तेचिवाखाणिले सर्व जगी !!

ज्ञान विज्ञानामुळेच माणूस सक्षम यशस्वी होतो हे संतांनी जाणले होते. याशिवाय महात्मा फुले ' शेतकऱ्याचाआसूड ` या ग्रंथात लिहितात

" विद्येविना मती गेली !
मतीविना नीती गेली !
नीतीविना गती गेली !
गतीविना वित्त गेले !
वित्तविना शूद्र खचले !
इतके अनर्थ एका अविद्येने केले !!``

ज्ञान हे समाज उन्नतीचे साधन आहे. ज्ञानाच्या बळावर व्यक्ती तर्कनिष्ठ विवेकवादी विचारसरणीने वागतो. शिक्षणातून माणूस स्वतंत्र विचाराचा झाला पाहिजे. त्याला महात्मा फुले मति म्हणतात. विचार स्वातंत्र्यामुळे नीती येते व नीतीमुळे व्यक्तीचे मानसिक बळ वाढते. ज्या व्यक्तीचे मानसिक बळ वाढलेले असते त्याचे जीवन गतिमान होते आणि गतिमान जीवनातून जे वित्त प्राप्त होते त्यामुळे व्यक्तीच्या चित्ताला स्वास्थ्य लाभते. बहुजन समाजाने ज्ञानाचा लाभ घ्यावा सदसदविवेकबुद्धी ने वागावे माणसाला देवाधर्माचे भय असून चालत नाही, तर त्याला आपल्या विवेकाचे भय पाहिजे. विवेक नसलेला माणूस

पशुसारखा असतो म्हणूनच संतांनी आपल्या अभंगवाणीतून कीर्तनातून समाजात विवेक जागविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**समारोप**

एकंदरीत बाराव्या शतकापासून संतांनी समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत कर्ममेळा, संत बसवेश्वर, संत एकनाथ, संत गोरा कुंभार,संत सावता माळी,संत सोयराबाई,संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत नरहरी सोनार इत्यादी संतांनी आपल्याला समाजात कसे हिनतेने वागविले जाते याचे चित्रण वेगवेगळया अभंगातून कीर्तनाद्वारे केले आहे. याचबरोबर वर्णभेद, जातीभेद, लिंगभेद यामुळे समाज व्यवस्थेत दबल्या गेलेल्या शोषणाखाली भरडल्या गेलेल्या संतांनी स्वतःचे अनुभव आपल्या अभंगात नोंदत असतानाच आपला जीवनपट नोंदवाला आहे. जातीभेद, वर्णभेद, विषमता, धर्म, अज्ञान, रूढी परंपरांना विरोध करून संत साहित्याने मानवता वादाचा पुरस्कार केला आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व वैज्ञानिक दृष्टिकोन ज्ञान विज्ञानाचे महत्त्व संत साहित्याने समाजाला दिले आहे. सामाजिक प्रबोधन घडवून आणण्यात संतांचे योगदान महत्त्वाचे आहे.

**संदर्भसूची**

१) गं.भा. सरदार - संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, प्रकाशन : लोक वाङ्मय गृह मुंबई
२) गंगाधर गीते - नामदेवे रचिला पाया तुका झालासि कळस, प्रकाशन : मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट नवी दिल्ली
३) https://www.santsahity.in>abhang
४) बाळासाहेब मिसाळ - तुकाराम महाराजांचे वैकुंठ गमन की हत्या ? प्रकाशन : मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट पुणे
५) आर. जे. पंडित –धर्मांधता निर्मूलन, प्रकाशिका प्रतिज्ञा देवराव भगत जि. हिंगोली पहिली आवृत्ती १४ऑक्टोंबर२०२०
६) महात्मा फुले – ‘ शेतकऱ्यांचा असूड, संदर्भ प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १२जानेवारी २०२०
७) डॉ. यु. म पठाण - मध्ययुगीन मराठी संतसाहित्य काही आयाम स्वरूप प्रकाशन औरंगाबाद २००३( प्र. आ.)